प्रकरण ३रे

# संशोधन पद्धती

# प्रकरण ३रे
# संशोधन पद्धती

**विषय निवडीचा उद्देश :**

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी ''पंचायतीराज्य व्यवस्थे अंतर्गत ग्रामपचांयत कुंभारी, ता.द. सोलापूर : एक अभ्यास'' (१० वी पंचवार्षिक योजना) हा विषय निवडला असून या विषया अंतर्गत दक्षिण सोलापूर तालुक्यातील एका महत्वपूर्ण अशा कुंभारी ग्रामपंचायतीचा अभ्यास १० व्या पंचवार्षिक योजनेच्या अनुषंगाने करण्यात येणार आहे. त्यात प्रामुख्याने कुंभारी ग्रामपंचायतीच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा आढावा घेण्यात येणार आहे. आणि विशेषत: सन २००२ ते २००७ या पाच वर्षात कुंभारी ग्रामपंचायतीने गावाच्या विकासासाठी कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबवल्या आणि त्याचा सर्वसामान्य नागरिकांना कितपत फायदा झाला याचा तपशिलवार अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी निवडलेल्या कुंभारी ग्रामपंचायतीचा व कुंभारी गावाचा भौगोलिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि इतर अनेक बारीक-सारीक गोष्टींचा तपशिल देणे हा ही एक महत्वाचा उद्देश या संशोधनापाठीमागे आहे. त्याबरोबरच ग्रामपंचायत ही व्यवस्था ग्रामीण पातळीवरील लोकशाहीचा पाया असल्यामुळे ही व्यवस्था ग्रामीण पातळीवर कशी काम करते याचा जवळून अभ्यास करता यावा म्हणून हा विषय उपरोक्त संशोधनासाठी निवडला आहे.

तसेच या संशोधनासाठी कुंभारी ग्रामपंचायत हा मर्यादित विषय असल्याकारणाने संशोधन कार्यास कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होत नाही व मर्यादित क्षेत्र असल्याने संशोधनास खूप वाव आहे, म्हणून हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**गृहितके :**

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी निवडलेल्या विषयासंबंधी खालीलप्रमाणे गृहितके दिली आहेत.

१) पंचायतीराज्य व्यवस्थेचे लाभ तळपातळीपर्यंत पोचले का? याचा अभ्यास करणे.

२) ग्रामपंचायतीने राबवलेल्या विविध विकास कामातून सर्वसामान्य जनतेस फायदा झाला आहे.

३) ग्रामपंचायतीच्या विविध समाज उपयोगी योजनांमध्ये लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो.

४) केंद्र तसेच राज्य सरकारांनी राबवलेल्या विविध योजनांची माहिती ग्रामपंचायतीतर्फे सर्वसामान्यांना दिली जाते. व या योजनांचा लाभ संबंधिताना मिळवून देण्याचा प्रयत्न ग्रामपंचायत करते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

उपरोक्त संशोधनासाठी खालीलप्रमाणे उद्दिष्ट्ये – स्वीकारली आहेत.

१) ग्रामपंचायतीचे ग्रामीण पातळीवरील महत्व याचा अभ्यास करणे.

२) ग्रामीण विकासासाठी ग्रामपंचयतीने केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

३) ग्रामपंचायतीच्या माध्यमातून लोकसहभागाचा अभ्यास करणे.

४) ग्रामपंचायतीचे यशापयश यांचे मूल्यमापन करणे.

५) ग्रामपंचायत कामकाज सुधारणेसाठीचे उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी **''पंचायतीराज्य व्यवस्थेअंतर्गत ग्रामपंचायत कुंभारी : एक अभ्यास'' (१० वी पंचवार्षिक योजना)** हा विषय निवडला असून या संदर्भात अभ्यास

करताना पंचयतीराज्य व्यवस्थेचा ग्रामीण पातळीवर झालेला परिणाम आणि त्या अनुषंगाने झालेल्या विकास कामाचा आढावा घेण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर करण्यात येईल.

त्याचबरोबर भारतातील लोकशाहीपद्धती, लोकशाही विकेंद्रीकरण ७३ वी व ७४ वी घटनादुरूस्ती या बाबींचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी ग्रंथालयीन पद्धतीचा विशेष वापर करण्यात येईल.

याचबरोबरच कुंभारी गाव आणि ग्रामपंचायतीसंबंधी अनेक बारीक-सारीक तपशिलासाठी सौक्ष्मिक संशोधन पद्धतीचा (Micro Level Research Method) आधार घेतला जाईल.

**माहितीचे संकलन :**

या शोधप्रबंधासाठी माहितीचे संकलन प्रत्यक्ष ग्रामपंचायतीस भेट देऊन तेथील रेकॉर्डवरून तसेच मुलाखतीच्या माध्यमातून केले जाईल. तसेच ग्रामपंचयतीचे वार्षिक अहवाल, वेगवेगळे निधी त्यांची आकडेवारी, तसेच ग्रामपंचायतीचे सन २००२-२००७ या पंचवार्षिक योजनेत कोणकोणते विकास कार्यक्रम राबविले. यासंबंधीची आकडेवारी यांच्या माध्यमातून माहितीचे संकलन केले जाईल. तसेच गावकामगार तलाठी कार्यालयातील शेतीसंबंधी, पिकासंबंधी व इतर अनेक लहान सहान बाबींच्या माहितीचे संकलन तलाठी कार्यालयातील रेकॉर्डवरून केले जाईल.

**माहितीचे विश्लेषण :**

या संशोधनासाठी वेगवेगळ्या माध्यमातून व संसाधनातून गोळा केलेल्या माहितीचे कालानुक्रमे पद्धतीशीर मांडणी केली जाईल. याशिवाय जागोजागी आवश्यक तेथे परिणामकारक माहिती देण्यासाठी कोष्टकांचा वापर करण्यावर भर राहील.तसेच ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड, वार्षिक अहवाल, वेगवेगळे निधी, वेगवेगळ्या योजनावरील खर्च

त्यांची आकडेवारी यांची तर्कसंगत तपासणी करून त्यांचे क्रमवार विश्लेषण करण्यावर भर राहील.

अशा प्रकारे प्रस्तुत शोध प्रबंधासाठी कुंभारी हे गाव लक्ष्य असून या गावातील ग्रामपंचायत आणि तिने राबविलेल्या सन २००२-२००७ या कालावधीतील वेगवेगळ्या विकास योजना यांचा अभ्यास करण्यावर विशेष भर असेल.

त्याचबरोरबर कुंभारी गावाची भौगोलिक, राजकीय, सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक जडण-घडण कशी होत गेली आणि कुंभारी हे गाव कसे विकसित होत गेले याचा एक सर्वसाधारण ऐतिहासिक आढावा या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न आहे.